# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७५ वी बैठक दिनांक २९ मे २०१३

### ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ७५ वी बैठक दि. २९ मे २०१३ रोजी मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) यांचे मंत्रालयीन दालन (दालन क्रमांक २४१ विस्तार), मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | इं. ए. बा. पाटील | ... | प्रधान सचिव (जसं) व सदस्य |
| ३. | इं. शि. मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कि.व.वाहुल | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्री. मु.ध. अंबादे | ... | प्रधान सचिव (वित्त विभाग) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. चं. आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| २. | इं. अविनाश सुर्वे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**सही/-**
**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**सही/-**
**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७५ वी बैठक दिनांक २९ मे २०१३

## ठराव

**ठराव क्रमांक ७५/१**

**"नियामक मंडळाच्या ७३ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही"**

**ठराव क्रमांक ७५/२**

**"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ७४ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

**ठराव क्र. ७५/३**

**"सन २०१२-१३ मधील सिंचनक्षमता निर्मिती उद्दिष्टे, पाणीसाठा निर्मिती उद्दिष्टे व प्रत्यक्ष साध्य तसेच सन २०१३-१४ मधील सिंचन क्षमता उद्दिष्टे व पाणीसाठा निर्मिती उद्दिष्टे यावर नियामक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. चर्चेमध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय व सूचना करण्यात आल्या.**

**१. जलसंपदा विभागास प्रत्येक तिमाहीकरिता अनुक्रमे २५%, १५%, ३०%, ३०% याप्रमाणात निधी वितरीत होतो. शेवटीच्या तिमाहीत एकतर निधी कपात होते किंवा शेवटच्या दिवशी निधी वितरीत केला जातो. त्यामुळे त्या त्या वर्षात निधी खर्च होत नाही. तसेच पुढील वर्ष सुध्दा पी.एल.ए. अकौंट मुळे सदरचा निधी खर्च होऊ शकत नाही. त्यामुळे निधी वितरण प्रत्येक तिमाहीकरिता अनुक्रमे ५०%,१०%,२५%,१५% या प्रमाणात होणे आवश्यक आहे. तसेच निधी वितरण तिमाहीच्या पहिल्या महिन्यात १५ तारखेपर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे. सिंचनक्षमता निर्मितीसाठीची वितरण व्यवस्थेची कामे लहान कंत्राटदांमार्फत केली जातात. त्यांची आर्थिक क्षमता कमी असल्याने वेळेवर निधी मिळाला नाही तर कामे बंद रहातात. परंतु वेळेवर निधी प्राप्त झाला नाही तरीसुद्धा मुख्य कालव्याची कामे मोठ्या कंत्राटदांमार्फत होत असल्याने ती चालू रहातात. त्यामुळे निधी खर्च होतो पण नियोजनानुसार सिंचनक्षमता निर्मित होत नाही. त्यामुळे सिंचनक्षमता उद्दिष्टे साध्य होण्यासाठी वेळेवर निधी उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.**

**२. सन २०१२-१३ मध्ये टेंभू, कृष्णा कोयना उपसा सिंचन योजना, धोम बलकवडी, तारळी, उरमोडी या प्रकल्पांना वर्षअखेर शेवटच्या दिवशी निधी उपलब्ध करण्यात आला. त्यामुळे तो खर्च होऊ शकला नाही. त्यामुळे नियोजनानुसार कामे पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होऊन सिंचन क्षमता निर्मितीवर परिणाम झाला. त्यामुळे सन २०१३-१४ मध्ये एआयबीपी अंतर्गत**

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७५ वी बैठक दिनांक २९ मे २०१३

मंजूर प्रकल्पांना राज्य शासनाने केंद्र शासनाकडून अनुदान उपलब्ध होणार आहे असे गृहीत धरुन अर्थसंकल्पिय तरतूदी वरील मुद्दा १ नुसार उपलब्ध करुन द्यावा. त्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

३. सन २०१३-१४ च्या कार्यक्रमात टंचाई प्रदेशातील कामांना प्राधान्याने तरतूदी केल्या असून, त्याद्वारे ७०६४५ हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्मिती व १५.३३ द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मिती करण्याचे नियोजन आहे. तसेच दुष्काळी प्रदेशातील ५८५ जास्त गांवाना पिण्यासाठी घरगुती वापरासाठी व जनावरांना चारा निर्मिती या कामांना प्राधान्य दिलेले आहे. त्यासाठी मुख्य कालव्याची जास्तीत जास्त लांबीची कामे सलगतेने पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्याचा परिणाम ऐ.आय.बी.पी. प्रकल्पाच्या MoU मधील सिंचन क्षेत्र निर्मितीच्या उद्दिष्ठावर होईल. याबाबत शासनास अवगत करण्यात यावे.

४. ज्या प्रकल्पांवर सुप्रमा पेक्षा जादा खर्च झालेला आहे व ज्यांना सन २०१३-१४ मध्ये आर्थिक तरतूद केलेली आहे त्या प्रकल्पांच्या सुप्रमा प्रस्तावास मान्यता होईपर्यंत उपलब्ध तरतुदीच्या मर्यादेत सुप्रमा पेक्षा जादा खर्च करण्यास शासनाची परवानगी मिळणे आवश्यक आहे. त्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

५. सन २०१३-१४ मध्ये महामंडळास मा. राज्यपालांच्या सुचनानुसार प्राप्त निधी प्राधान्याने टंचाई भागातील प्रकल्पावर खर्च करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे इतर भागातील प्रकल्पांवर पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकलेला नाही. त्यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर, पुणे व सातारा जिल्ह्यातील डोंगरी व जास्त पावसाच्या प्रदेशातील प्रकल्पांचा समावेश आहे. पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने या भागातील लोक व लोकप्रतिनीधींची तिव्र नाराजी निर्माण झालेली आहे. त्यामुळे प्रकल्पांना अतिरिक्त तरतूद उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करावा."

ठराव क्रमांक ७५/४

"ठराव करण्यात येतो की, मेरी टाईम एनर्जी हेली एअर सर्विसेस प्रा.लि., मुंबई या संस्थेस धोम धरणापासून मुंबई (जुहू एअरपोर्ट) ते धोम धरण अशी जलविमान वाहतूक करण्यासाठी धोम जलाशयाचा वापर धावपट्टी म्हणून वापरण्यासाठी खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास नियामक मंडळाची तत्व:त मान्यता देण्यात येत आहे.

अटी

- शासन निर्णय नगरविकास विभाग मुंबई यांचे दि. १६.११.१९९५ च्या नोटीफिकेशन नुसार धरण सुरक्षिततेसाठी धरणाचे भिंतीपासून कमीत कमी ५०० मीटर अंतराबाहेर विमान उतरविणे व उड्डाण करणे बंधनकारक राहील.

"मान्य"

सही/-
(इंजि. शि. मा. उपासे)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ७५ वी बैठक दिनांक २९ मे २०१३

- विमान वाहतूकीमुळे धरणास कोणत्याही प्रकारचा धोका पोहचणार नाही याची काळजी घेण्याची सर्व जबाबदारी संस्थेची राहील.
- धोम जलाशय हा परिसर सहयाद्री पर्वत रांगांनी व्यापलेला डोंगराळ प्रदेश आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात फार्म हाऊसेस / नागरी वस्ती आहे, याचा विचार करुन त्यांना कुठल्याही प्रकारे धोका होणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी संस्थेवर राहील.
- धरणातून सिंचनासाठी पाणी सोडले जाते. त्यामुळे धरणाचे पाणी पातळीत सतत बदल होत असतो, त्यामुळे विमान उतरविणे (Landing )व उड्डाणाचे (Take off) वेळी जलधाव पट्टी (Water strip For runway ) वर्षभर उपलब्ध राहील याची जलसंपदा विभाग हमी देणार नाही.
- प्रस्तावित विमान वाहतुकी दरम्यान विमानाचे इंधन / ऑईल यामुळे जलप्रदुषण होवून जलाशयातील जैव संपत्तीला धोका संभावणार नाही याबाबतची खबरदारी घेण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.
- धोम जलाशयात परवानगी देण्यात आलेल्या खाजगी बोट धारकांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून विमान उतरविण्याच्या व उड्डाणाच्या आधी पूर्व सूचना देणे संस्थेवर बंधनकारक राहील.
- प्रस्तावित विमान वाहतूक करताना प्रवाशी व विमानसेवा कर्मचारी यांच्या सुरक्षेची जबाबदारी संस्थेवर राहील.
- पावसाळ्यात किंवा पुरपरिस्थितीच्या काळात जलाशयावर विमान उतरविणे व उड्डाण करणे धोक्याचे ठरू शकते व त्याची जबाबदारी संस्थेवर राहील.
- जलाशयाचा वापर विमान उतरविणे व उड्डाण करण्यासाठी महामंडळास / जलसंपदा विभागास संस्थेने मोबदला द्यावा लागेल. त्याबाबत व्यवहार्य प्रस्ताव संस्थेने सादर करावा. प्रत्यक्ष करारनामा करण्यापूर्वी सदर प्रस्तावास मान्यता घेणे व त्यानुसार मोबदला / स्वामित्व शुल्क महामंडळास देणे संस्थेवर बंधनकारक राहील.
- जलाशयाच्या परिसरात पर्यटन विकासासाठी चालना देण्याच्या उद्देशाने सदरची ना हरकत देण्यात येत आहे. भविष्यात जलाशयाच्या परिसरात पर्यटणासाठी निवासस्थाने, उद्याने इ. पायाभूत सुविधा देण्यासाठी त्रयस्थ संस्थेस सामाऊन घेण्याचे ठरल्यास महामंडळ, विमानसेवा देणारी प्रस्तुत संस्था व पायाभूत सुविधा देणारी तिसरी संस्था यामध्ये त्रिपक्षिय करार करावयाचा झाल्यास त्यात सहभागी होणे सदर संस्थेस बंधनकारक राहील.
- जलाशयाच्या पृष्ठभागावर जलविमान उतरविणे / उड्डाण करणे या संदर्भात जलसंपदा विभागाचे किंवा शासनाच्या इतर कुठल्याही खात्याचे शासन निर्णय, परिपत्रक, किंवा

"मान्य"

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ७५ वी बैठक दिनांक २९ मे २०१३

मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी व भविष्यात शासनाकडून पारित होणारे परिपत्रके शासन निर्णय, मार्गदर्शक तत्वे यांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

- विमान चालविण्यासाठी, उतरविण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर विहित शासन यंत्रणांची मान्यता व पर्यावरण मान्यता घेण्याची सर्व जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.
- विमान वाहतूकीच्या अनुषंगाने जलाशयाबाहेर पोहोच रस्ते व इतर सुविधा निर्माण करण्याची जबाबदारी संस्थेची राहील त्यासाठी किमान आवश्यक जागेसाठी स्वतंत्र मागणी करणे व त्याबाबतचे महामंडळाच्या प्रचलीत नियमानुसार भाडे अदा करणे संस्थेस बंधनकारक राहील.
- धोम जलाशयात भविष्यात इतर विमान कंपनीने उतरण्यासाठी / उड्डाणासाठी मागणी केल्यास ती देण्याचा अधिकार महामंडळाचा राहील.
- संस्थेने करारनामा करणेपूर्वी रु. २५ लक्ष अनामत रक्कम रोख अथवा बँक गॅरंटीच्या स्वरुपात भरणे बंधनकारक राहील.
- करारनामा करण्यापूर्वी कंपनीचा इतर ठिकाणी चालू असलेला जलविमान वाहतूक प्रकल्पास महामंडळातील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देवून संभाव्य प्रकल्पाबाबत माहिती घ्यावी व त्यानुसार आवश्यक तरतूदी करारनाम्यात (MoU) मध्ये कराव्यात.”

ठराव क्रमांक ७५/५

“उच्च न्यायालयात चालू असलेली खाजगी संस्था / निमशासकीय संस्था यांना जमीन भाडेपट्याने देण्याबद्दलची याचिका प्रलंबित असल्याने सदरची मागणी सध्या प्रलंबीत ठेवण्याचे चर्चेअंती ठरले.  त्यामुळे याबाबत कोणताही ठराव करण्यात आला नाही.”

ठराव क्र.७५/६

“नियामक मंडळाच्या बैठकीत सदर विषय अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.”

“मान्य”

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ७५ वी बैठक दिनांक २९ मे २०१३

**मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय**

**ठराव क्र.७५/७**

**"ठराव करण्यात येतो की, टेंभू उपसा सिंचन प्रकल्पावरील टप्पा १अ, १ब, ३अ, ३ब, ४ व ५ साठीच्या पंपींग यंत्रसामुग्रीचा व अनुषंगीक घटक भागांचा पुरवठा अंदाजे १२ वर्षांपूर्वी झालेला असून तत्कालीन नियोजनानुसार अपेक्षित निधी उपलब्धता न झाल्याने पंपगृहाची स्थापत्य कामे पूर्ण न झाल्याने पंपांची उभारणी व कार्यान्वितीकरण होवू शकले नाही. त्यामुळे पुरवठा झालेली पंपींग यंत्रसामुग्री व विद्युत सामुग्री व अनुषंगीक घटक भाग विनावापर पडून राहिले आहेत. ही सर्व सामुग्री बऱ्याच वर्षापासून विनावापर राहिल्याने हवामान, उष्णता यांचेमुळे या लोखंडी भागांना गंज चढला आहे. तसेच काही घटक उदा.रबर पार्ट, ओ-रींग्ज, बेअरिंग बुश इ. तसेच विद्युत भागापैकी Cable, Relays, Winding-warnishing, स्वीचेस इ. घटकांचे निर्धारीत आयुर्मान संपलेले आहे. त्यामुळे या कालावधीमध्ये यंत्रसामुग्रीच्या काही सुट्या भागांचे नैसर्गिक आयुष्य संपल्याने नुकसान झाले आहे. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमध्ये आटपाडी, सांगोला, खानापूर या दुष्काळी भागास पाणी पुरवठा करण्यासाठी टेंभू योजनेची टप्पा १अ, १ब, ३अ, ३ब, ४ व ५ चे पंप कार्यान्वित करणे अत्यावश्यक आहे. दुरूस्तीच्या कामामध्ये पंप ओव्हरहॉल करणे, नटबोल्ट व स्टेनर जाळी बदलणे, खराब झालेले रबर पार्ट बदलणे, पाईप व पंप पेंटींग करणे, विद्युत मोटर ओव्हरहॉल करणे, कपॅसिटर व सॉफ्ट स्टार्टर पॅनेल, बॅटरी चार्जर पॅनेल, रिमोट कंट्रोल पॅनेल, दुरूस्ती करणे इ. कामाचा समावेश आहे. त्यासाठी पुर्वी पुरवठा झालेल्या यंत्रसामुग्री व विद्युत उपकरणांची अत्यावश्यक व अपरिहार्य असलेली दुरूस्ती करण्यासाठी व सुटे भाग बदलण्यासाठी येणाऱ्या खर्चास नियामक मंडळाची खास बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष,मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (इंजि. शि. मा. उपासे) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |